## लॉस एंजल्सविषयी थोडेसे:

लॉस एंजल्स. अमेरिकेतील सर्वात मोठे शहर. अमेरिकेतील न्यूय़ॉर्क, शिकागो, वॉशिंग्टन, ओरलँडो वगैरे शहरे पाहिल्यानंतर अजून कुठलेही शहर पाहण्याची माझी फारशी आकांक्षा उरली नव्हती. तेच ते highways, तीच ती सुंदर घरे, त्याच त्या सुबक हिरवळी, तशाच त्या उंच इमारती, तेच ते इंग्रजी बोलणारे काळे-गोरे, त्यांचे तेच ते manners, तीच ती Burger King आणि Pizza Hut ची restaurants, तेच अन् तस्सेच ते K Mart. काही वेगळेपणा असा नाहीच. तसे पाहिल्यास न्यूय़ॉर्कच्या गगनचुंबी इमारतींचा दिमाख अन्यत्र कुठेच नाही. शिकागोची skyline फक्त शिकागो मध्येच. पण तरीही असे एक-दोन अपवाद वगळता या सर्व शहरांमध्ये माहौल तोच. एक चांगला नकाशा सोबत असेल तर कुठल्याही शहरात हिंडणे-फिरणे अगदीच सुलभ. काही नवीन साहस करीत आहोत हा रोमांचकारी अनुभवच नाही. शिकागोत तर कधी homesick वाटले की मी चक्क K Mart मध्ये चक्कर टाकी. तिथला ओळखीचा रागरंग पाहून सिरेक्यूजला व पर्यायाने घरी आल्याचे समाधान मिळे.

त्यामुळे एकंदरीतच कॅलिफोर्निया तरी एवढे काय विशेष असणार आहे, असा प्रश्न करीतच मी लॉस एंजल्सला आलो. परंतु दोन महिन्यातच लॉस एंजल्सने आपला वेगळेपणा माझ्या मनावर ठसविला. अगदी पहिल्या दिवसापासून प्रत्येक गोष्ट माझ्या अपेक्षेविरूद्ध दिसू लागली. इतकी की ही अमेरिकाच ना असा प्रश्न पडावा. अर्थात लॉस एंजल्सने माझे मन वगैरे जिंकले नाही. अमेरिकेतले कुठलेच शहर मन बिन काही जिंकू शकत नाही असे मला वाटते.

लॉस एंजल्समधला मेक्सिकन लोकांचा भरणा पाहून मी चाटच झालो. मेक्सिकोची राजधानी लॉस एंजल्स का नाही असा प्रश्न पडावा. हे लोक दिसायला वागायला बरेचसे भारतीयांसारखे. यांच्या स्पॅनिश भाषेतही र, त, फ बरेच. रोज सकाळी कंपनीत जाताना रस्त्यांवर दुतर्फा हे लोक बसची वाट पाहात उभे असलेले पाहून माझ्या मनात मुंबई-पुण्याची सय दाटून यायची. या लोकांचा अवतारही आपल्यासारखाच. मळके, चुरगळलेले कपडे, अंघोळीची खात्री नाही, केस वाऱ्यावरच. सकाळच्या कोवळ्या वेळी एक-दोन dark goggles, लाल-हिरवे कपडे, लायनीत वगैरे उभे राहायचा तर प्रकार नाहीच. एखादी पाठीतून वाकलेली म्हातारी, एखादी लठ्ठशी स्कर्ट घातलेली मध्यमवयीन. एक-दोन सुबक ठेंगण्या – भडक लिपस्टीक लावलेल्या. आणि उरलेले गंजिफ्रॉक घातलेले टगे! हे मेक्सिकन लोक लॉस एंजल्समध्ये सर्वत्र आहेत. Down-town मध्ये तर यांचाच इलाखा आहे. स्वच्छतेचा षोक फक्त इंग्रजांनाच आहे की काय कुणास ठाऊक. या मेक्सिकन लोकांना स्वच्छता मानवत नाहीशी दिसली. भारतातले काही ओळखीचे वास – जे मी सिरेक्यूजच्या भागात पूर्णतः विसरलो होतो – इथे पुनश्च उपभोगावयास मिळाले. रस्त्यांवरून अक्षरशः हजारो गाड्यांची वाहतुक होत असल्याने बहुधा रस्ते स्वच्छ राहात असावेत. पण फुटपाथ, लोकांची घरे, ओसऱ्या, पटांगणे, दुकाने सर्व “स्वच्छता राखा” पाटीची आठवण करून देणारे. नट्टापट्टा करून,

चांगले कपडे घालूनही यांना ही अस्वच्छता जाणवत नव्हतीच. मला वाटते स्वच्छता ही एक संस्कृतीचाच भाग आहे.

‘संवाद’ हा एक नवीनच धक्का होता. East मध्ये कुठेही गेले की पटकन एक स्मित करून “What can I do for you” असे विनवणाऱ्या चेहऱ्याची मला सवय झालेली. इथला अनुभव निराळाच. एक शक्यता म्हणजे अगदीच मख्ख चेहरा. किंवा कपाळावर एक-दोन आठ्या व डोळयात त्रासिक प्रश्नचिन्ह. अशावेळी हा इसम काही बोलला नाही याचाच आनंद व्हावा. कुठलाही प्रश्न (विशेषतः माझा) यांना पहिल्या सपाट्यात कळला तर हे हे नव्हेतच. साहजिकच भुवया आक्रसून ’व्हाट’ हा प्रश्न यायचाच.

इथे ओरिएंटल लोकही जवळपास मेक्सिकनांइतकेच. कोरियन, चिनी, सयामी, असे यांच्यामध्ये पोटविभाग आहेत. पण सर्वांची संस्कृती सारखीच. भाषांतही फरकापेक्षा साम्य जास्त. गुजराती-मराठी सारखी परिस्थिती.

या ओरिएंटल – यांना आपण पौर्वात्य म्हणू – लोकांची इथे प्रचंड वस्ती आहे. हे पौर्वात्य आणि मेक्सिकन लोक खूपच मिसळले आहेत. यांची अंगकाठी सारखीच. मेक्सिकनांच्यात सावळयापासून अगदी गोऱ्यापर्यंत सर्व छटा आहेत. तशीच अवस्था पौर्वात्यांची. दोघांचेही केस काळे. लॉस एंजल्समध्ये कोरिया-टाऊन, चायना-टाऊन अशी यांची गावे असली तरी यांच्या कर्तृत्वास कुठल्याच सीमा नाहीत. स्वच्छता, राहणी याबाबतीत पौर्वात्य मेक्सिकनांसारखेच. भाषेच्या बाबतीत हे सर्व लोक स्वाभिमानी दिसतात. कोरिया-टाऊनमध्ये सर्व पाट्या कोरियन भाषेत, तर चायना-टाऊनमध्ये चायनीज भाषेत. एकमेकातला संवादही आपापल्या भाषेतून. मी इथे आल्यावर स्पॅनिश, चायनीज याच भाषा जास्त ऐकल्या. अमेरिकन लोक मुळातच कमी. University, काही उपनगरे, हॉलिवूड – मॅलिबूच्या श्रीमंत वस्त्या अशा ठिकाणी बहुतेक गोरे अमेरिकन्स आसरा घेऊन आहेत.

मी एकदा केस कापण्यासाठी एका कोरियन न्हाव्याकडे गेलो. त्याला इंग्रजी अजिबात येत नव्हते. आमचा सर्व संवाद खाणाखुणांनीच झाला. पण त्याची कर्तनशैली भारतीय पद्धतीशी इतकी मिळतीजुळती होती की माझा आनंद अनावर झाला. माझ्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून त्यालाही हुरूप चढत गेला. शेवटी दिलेले 10 डॉलर्स हाच आमच्यातला एकमेव अमेरिकन दुवा होता. एकंदरीतच पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृती अतिशय भिन्न आहेत. मनातले विचार चेहऱ्यावर दाखवणे या बाबतीतही. अमेरिकन चेहरे सतत तऱ्हेतऱ्हेच्या हावभावांनी वेडेवाकडे होत असतात. आश्चर्य वाटले की तोंडाचा आ, बुबुळे मोठी, कपाळ आक्रसलेले झालेच पाहिजे. जोडीला ‘Really! No kidding!’ या प्रकारची पाच-सहा वाक्ये वरच्या pitch मध्ये आली पाहिजेत. कुणाविषयी सहानुभूती दाखवायची झाल्यास कमालीचे दुःखी डोळे, तोंडाचा चंबू आणि ‘Oh no! Poor thing!’ असे रडक्या सुरातले उद्‌गार आलेच पाहिजेत. आणि या गोष्टींना पुरूष-स्त्री असा फरक नाही. दोघेही याच प्रकारातले. याउलट पौर्वात्य संस्कृतीत चेहरा शक्य तेव्हढा कोरा व सरळ ठेवणे हा खरा पुरूषार्थ. आवाजाची लांबी-रूंदी जराही कमी-जास्त न होणे हे खरे कौशल्य.

याबाबतीत पुरूषांचे वागणे अधिकच या प्रकारचे असते. शारीरिक हालचालींना तर पूर्ण मज्जाव आहे. आनंदाने उडी मारणे ही केवळ 5 वर्षांच्या बालकालाच परवानगी आहे. माझ्या ऑफिसमधल्या बायका ज्या नाना प्रकारे वेडेवाकडे चेहरे आणि हालचाली करीत असतात, त्या प्रकारांना पौर्वात्य संस्कृतीत पोरकटपणा, अश्लीलपणा, किंवा आचरटपणा अशीच विशेषणे मिळतील. कॅलिफोर्निया हे अमेरिकेतील सर्वात श्रीमंत राज्य. लॉस एंजल्समधे त्यामुळेच खूप ऐश्वर्य आढळते. रस्त्यांवर सर्रास sports cars, Mercedes, BMW अशा गाड्या दिसतात. रात्रीच्यावेळी करमणुकीच्या स्थळांचा झगझगाट सर्वत्र दिसतो. Beverly Hills मधली घरे अलिशान आणि प्रचंड या शब्दांना कमीपणा आणतील अशी आहेत. हे ऐश्वर्य मात्र सर्वांपाशीच नाही. सोन्याच्या शोधात आलेल्या सर्वांनाच खाणमालक होता येत नाही, तद्वत LA त या ऐश्वर्यास पोसणारे गरीब लोकही खूप आहेत. अमेरिकेत आजवर मी भिकारी कुठेच पाहिले नव्हते. न्यूयॉर्कमधल्या मग्रूरीने आणि गुर्मीत पैसे मागणाऱ्या लोकांना भिकारी म्हणवत नाही. इथे दीनवाण्या स्वरात भीक मागणारे भिकारी खूप ठिकाणी आढळले. फक्त आंधळया – लंगड्याची नाटके कुणीच करत नव्हते.

ऐश्वर्याबरोबर व अशा दारिद्र्याबरोबर येणाऱ्या गुंडगिरीतही LA अग्रेसर आहे. इथल्या सर्वच लोकांना एक प्रकारची गुर्मी आहे. गुन्हेगारीत LA चा हात दुसरे कुठलेही शहर धरणार नाही. Highway वर तुम्ही एखाद्याला त्याच्या मर्जीविरूद्ध overtake केलेत तर तो खिडकीतून तुमच्यावर गोळ्या झाडण्याची शक्यता नाकारता येत नाही. LA मध्ये रात्री – अपरात्री स्त्रियाच काय, पुरूषही जीव मुठीत घेऊनच हिंडू शकतात. बेकायदेशीर drugs ही LA ची प्रचंड समस्या आहे. भारतात असताना अमेरिकेविषयी जी गुन्हेगारी, श्रीमंती, रक्तपात, भोगविलास अशी संमिश्र प्रतिमा होती तिचे खरे रूप LA मध्ये दिसते.

लॉस एंजल्सचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथल्या गाड्या. इथल्याइतक्या cars मी कुठेच पाहिल्या नाहीत. सदासर्वकाळ सर्व highways तुडुंब वाहात असतात. LA मध्ये public transport साठी फक्त buses आहेत. त्यामुळे गाडीशिवाय आयुष्य कठीणच. या प्रचंड वाहतुकीमुळे अनेक दुष्परिणामही झालेले आहेत. एक म्हणजे बेफाट, बेपर्वा driving मुळे अपघात खूप होतात. कुठल्याही highway वर सरासरी रोज एक-दोन अपघात झाले नाहीत असा दिवस विरळा. त्यामुळे जीव मुठीत घेऊन गाडी चालवीत राहाणे हा एकच उपाय लक्षावधी लोकांसमोर असतो. दुसरा दुष्परिणाम म्हणजे हवेचे प्रदूषण. गाड्यांच्या इंधनवायूमुळे हवेचे प्रदूषण होते असे मी पुस्तकात वाचून होतो. पण म्हणजे नक्की काय होते हे Los Angeles मध्ये पाहावयास मिळते. LA मध्ये 12 ही महिने प्रदूषण असते. Downtown मधल्या उंच इमारती केवळ एक मैलावरून अंधुक दिसू लागतात.

असे हे Los Angeles फोफावते आहे, सर्व बाजूंनी वाढते आहे. इथल्या कुणालाच ते सोडून इतरत्र जावेसे वाटत नाही. बारा महिने उबदार हवेचे या लोकांना व्यसन लागले आहे. त्यामुळे

थंडी, स्नो असे शब्द ऐकूनही त्यांच्या अंगावर काटा येतो. सर्वांचे पालनपोषणही नाना प्रकारे होत असते. काहीच नसले तर कोकेनची धुंदी सगळ्याचाच विसर पाडते.

*लेखक: अभय बिंदुमाधव जोशी*
*जानेवारी 1989*